आवृत्ती पहिली

त्रै मासिक
एप्रिल - जून २०२६

धि गोवा हिंदु असोसिएशन

# गोमंत तरंग

संपादक - जितेश सावंत

धि गोवा हिंदु असोसिएशन, गोमंतधाम, ३५८, डॉ. भडकमकर मार्ग, मुंबई - ४०० ००७.
संपर्क - मुंबई - ०२२-४९७९८२५६ / मोबा - ९०८२१८३८०६
स्थापना - १९१९ रजिस्टर १९४०
Email :gomanttarang@gmail.com / Web.:https://goahinduasso.org

# 'गोमंत तरंग'

## संपादकीय विभाग


| | | |
|---|---|---|
| संपादक | : | श्री. जितेश सावंत |
| उपसंपादक | : | श्री. समीर कामत |
| सल्लागार मंडळ | : | श्री. सुभाष सराफ, श्रीमती निरुपा केणी, श्री. विजय केंकरे |
| संपादकीय मंडळ | : | श्री. राजेंद्र पै, ॲड. महादजी प्रभुदेसाई, श्रीमती शर्मिला रेडकर, श्रीमती रजनी लोटलीकर, श्रीमती रश्मी हळर्णकर |


## THE GOA HINDU ASSOCIATION

### MANAGING COMMITTEE MEMBERS (2025-2027)

| No. | Designation | Name |
|---|---|---|
| 1 | President | CA Subhash Saraf |
| 2 | Vice President | Smt. Nirupa Quenim |
| 3 | Vice President | Shri Vijay Kenkre |
| 4 | Vice President | Shri Anil B. Pai Kakode |
| 5 | Chairman | Smt. Smita Partagalkar |
| 6 | Vice Chairman | Shri Rajendra Pai |
| 7 | Jt. Secretary | Shri Jitesh Sawant |
| 8 | Jt. Secretary | Smt. Sharmila Redkar |
| 9 | Jt. Treasurer | Shri Bhushan Moye |
| 10 | Jt. Treasurer | Shri Samir Kamat |
| 11 | Member | Shri Shirish Borkar |
| 12 | Member | Shri Omprakash Pilgaonkar |
| 13 | Member | Adv. Mahadji Prabhudesai |
| 14 | Member | Smt. Medha Keni-Gaitonde |
| 15 | Member | Smt. Rashmi Halarnkar |
| 16 | Member | Smt. Rajani Lotlikar |

# गोमंत तरंग (ऑनलाईन त्रैमासिक)

अंक पहिला : एप्रिल ते जून २०२६

## अनुक्रमणिका


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | संपादकीय | - | श्री. जितेश सावंत (संपादक) | १ |
| २. | अध्यक्षांचे मनोगत | - | सी. ए. सुभाष सराफ (अध्यक्ष) | २ |
| ३. | दिव्यत्वाची जेथे प्रचिती तेथे कर माझे जुळती (संस्थेचा १०६ वर्षांचा प्रवास) | - | श्रीमती निरुपा केणी (उपाध्यक्षा) | ४-६ |
| ४. | दिग्गज दिग्दर्शक विजय केंकरे यांची विशेष मुलाखत | - | मुलाखतकार : श्री. जितेश सावंत | ७-१२ |
| ५. | धि गोवा हिंदु असोसिएशन वर्धापन दिन सोहळा | - | श्री. जितेश सावंत (सेक्रेटरी व संपादक) | १३-१४ |
| ६. | शुभेच्छा संदेश (Blessings & Wishes) | - | मान्यवरांचे संदेश | १६-२३ |
| ७. | वाचकांसाठी आवाहन आणि संपर्क | - | संपादकीय मंडळ | २६ |


**मुखपृष्ठ सजावट आणि अंकाची मांडणी**
**श्री. महेश दिपक गावडे**
**(www.growbizmediatech.com)**

## अस्वीकरण (Disclaimer)

या त्रैमासिकात प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मते आणि विचार हे सर्वस्वी संबंधित लेखकांचे असून, त्याच्याशी 'दि गोवा हिंदू असोसिएशन' किंवा संपादकीय मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखनातील सत्यता, संदर्भ आणि तथ्यांची सर्व जबाबदारी संबंधित लेखकाची राहील. प्राप्त झालेले साहित्य संपादित करण्याचा किंवा नाकारण्याचा सर्वाधिकार संपादकीय मंडळाकडे राखीव आहे.
या अंकातील मजकुराचा अनधिकृत वापर किंवा पुनर्मुद्रण करण्यास मनाई आहे.

**प्रकाशक : धि गोवा हिंदु असोसिएशन, मुंबई.**
**प्रस्तुत त्रैमासिक केवळ संस्थेचे सभासद आणि हितचिंतकांसाठी खाजगी वितरणाकरिता (For Private Circulation Only) असून ते विक्रीसाठी नाही.**

# संपादकीय

नमस्कार,

गुढी पाडव्याच्या आणि हिंदु नववर्षाच्या या शुभमुहूर्तावर 'गोमंत तरंग' या त्रैमासिकाचा हा पहिला अंक आम्ही आपल्यासमोर सादर करत आहोत. 'धि गोवा हिंदु असोसिएशन'च्या' १०६ वर्षांच्या दीर्घ, समृद्ध आणि गौरवशाली वाटचालीतील एक महत्त्वाचा टप्पा म्हणून हे त्रैमासिक साकार होत आहे, याचा मला विशेष आनंद आणि अभिमान वाटत आहे.

संस्थेच्या १०६ व्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री. सुभाष सराफ यांनी आपल्या भाषणातून मांडलेली एक सुंदर कल्पना आज या त्रैमासिकाच्या रूपाने मूर्त स्वरूपात येत आहे. ही माझ्यासाठी केवळ कौतुकाचीच नव्हे, तर अत्यंत भावनिक आणि प्रेरणादायी बाब आहे. त्या दिवशी मांडलेली संकल्पना आज प्रत्यक्षात साकार होताना पाहणे सुखद आहे.

या त्रैमासिकाच्या संपादकपदाची जबाबदारी अध्यक्ष श्री. सुभाष सराफ यांनी माझ्या खांद्यावर सोपवली, तसेच उपाध्यक्षा श्रीमती निरुपा केणी यांनीही ही जबाबदारी स्वीकारण्याबाबत आग्रह व्यक्त करून मला मनापासून पाठिंबा दिला. त्यांच्या विश्वासामुळे आणि प्रोत्साहनामुळे मला अधिक बळ मिळाले आहे. ही जबाबदारी केवळ पदाची नसून संस्थेच्या विचारपरंपरेचा, संस्कृतीचा आणि मूल्यांचा वारसा पुढे नेण्याची आहे, याची मला पूर्ण जाणीव आहे.

'गोमंत तरंग'च्या माध्यमातून गोमंतकीय संस्कृती, संस्थेची गौरवशाली परंपरा आणि साहित्यिक अभिव्यक्ती यांचा समतोल आढावा घेण्याचा आमचा प्रयत्न राहील. दर्जा, सत्यता आणि सकारात्मकता ही मूल्ये जपत विविध क्षेत्रांतील मान्यवर लेखकांचे विचार आम्ही वाचकांसमोर मांडणार आहोत. समाजाला सकारात्मक दिशा देणारे आणि वैचारिक समृद्धी आणणारे साहित्य वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे हे एक सक्षम व्यासपीठ ठरावे, हेच आमचे मुख्य उद्दिष्ट आहे.धि गोवा हिंदु असोसिएशनच्या कार्यातून अनेक वर्षे जे विचार, उपक्रम आणि सांस्कृतिक ठेवे जपले गेले आहेत, ते देखील या त्रैमासिकाच्या माध्यमातून शब्दरूपात वाचकांपर्यंत पोहोचवण्याचा हा एक प्रामाणिक प्रयत्न राहील. तसेच हे त्रैमासिक केवळ माहिती देणारे माध्यम न राहता आपल्या आठवणी, आपली ओळख आणि आपली माणसे यांना जोडणारा एक सशक्त सेतू ठरेल, अशी मला खात्री आहे.या निमित्ताने एक आनंदाची बातमी आवर्जून सांगावीशी वाटते.' धि गोवा हिंदु असोसिएशन'ने रंगभूमीवर पुनरागमन केले आहे. संस्था आणि 'सुकल्प चित्र' यांच्या संयुक्त विद्यमाने, श्री. विजय केंकरे यांच्या दिग्दर्शनाखाली "सुभेदार गेस्ट हाऊस" हे नवे मराठी नाटक रंगभूमीवर सादर झाले आहे. या नाटकाला आपण सर्वांनी उदंड प्रतिसाद देऊन यशस्वी करावे, असे आवाहन मी या निमित्ताने करतो.

संस्थेचा भक्कम पाठिंबा, मार्गदर्शक मंडळाचे मार्गदर्शन, संपादकीय टीमचे योगदान आणि वाचकांचे प्रेम यांच्या बळावर 'गोमंत तरंग' निश्चितच आपल्या अपेक्षांना साजेसा ठरेल, असा मला विश्वास वाटतो. वाचक, सदस्य, लेखक आणि शुभेच्छुक यांचे सहकार्य व सक्रिय सहभाग आम्हाला नेहमीच प्रेरणा देत राहील.

आमचा हा शब्दरूपी प्रयत्न आपणा सर्वांना नक्कीच आवडेल, असा मला विश्वास आहे. हा अंक आपण वाचून आपल्या मौल्यवान प्रतिक्रिया आम्हाला नक्की कळवाव्यात, ही नम्र विनंती.

आपला नम्र,

**श्री. जितेश सावंत,**
संपादक, गोमंत तरंग

# अध्यक्षांचा संदेश

नमस्कार !

मराठी नववर्षाच्या पावन पर्वावर गुढीपाडव्याच्या शुभमुहुर्तावर आपल्या 'धि गोवा हिंदु असोसिएशन' या संस्थेचे पहिले त्रैमासिक 'गोमंत तरंग' प्रकाशित करताना संस्थेचा अध्यक्ष म्हणून मला मनस्वी आनंद वाटत आहे.

गुढीपाडवा हा केवळ नव्या वर्षाचा आरंभ नाही तर नव्या विचारांचा, नव्या संकल्पांचा आणि नव्या दिशेचा उत्सव आहे आणि याच भावनेतून या मासिकाची सुरवात करण्यात येत आहे. आपल्या समाजातील संस्कृती, परंपरा, समकालीन प्रश्न, युवकांची उर्जा आणि भविष्याचा वेध या सर्वांचे तरंग या मासिकातून उमटावेत हाच या उपक्रमामागील मुख्य हेतु आहे. 'धि गोवा हिंदु असोसिएशन' ही संस्था समाजहित, सांस्कृतिक जतन, वैचारिक संवाद आणि सामाजिक एकोपा यासाठी सातत्याने कार्यरत आहे. हे मासिक केवळ माहिती देणारे नव्हे, तर विचारांना दिशा देणारे, संवाद घडवणारे आणि समाजाला जोडणारे व्यासपीठ ठरेल, असा आम्हाला विश्वास आहे. प्रत्येक त्रैमासिकातून नवे विषय, नवी मते आणि नवे दृष्टिकोन मांडण्याचा आमचा प्रयत्न राहील.

या पहिल्या अंकाच्या माध्यमातून आपण सर्व वाचक, सदस्य, विचारवंत, युवक व समाजबांधवांना या वैचारिक प्रवासात सहभागी होण्याचे आमंत्रण देत आहोत. आपल्या सूचनांमुळे, सहभागामुळे आणि पाठिंब्यामुळेच हा उपक्रम अधिक समृद्ध होईल.या मंगल प्रसंगी आपण सर्वांना मराठी नववर्षाच्या व गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा - नूतन वर्षाभिनंदन ! हे नवे वर्ष आपल्या सर्वांच्या आयुष्यात आरोग्य, समृद्धी, सकारात्मकता आणि सामाजिक एकतेचा संदेश घेऊन येवो, हीच सदिच्छा.

**– श्री. सुभाष सराफ**

अध्यक्ष, धि गोवा हिंदु असोसिएशन

# दिव्यत्वाची जेथे प्रचिती तेथे कर माझे जुळती

**उपाध्यक्षा - श्रीमती निरुपा केणी**

२४ ऑगस्ट १९१९ रोजी गिरगांवातल्या मराठा हायस्कूलमध्ये श्री. वामनराव उर्फ आबासाहेब केरकर यांच्या अध्यक्षतेखाली गोमंतकीयांची एक जाहीर सभा बोलवण्यांत आली. या सभेत विचार विनिमय होऊन, गोमंतकीय हिंदुंना संघटित करण्यासाठी आणि मुख्यत: त्यांच्या सर्वंकष हितासाठी, एक सेवाभावी संस्था स्थापन करावी असे ठरले व सर्वानुमते या संस्थेचे "धि गोवा हिंदु असोसिएशन" असे नामकरण करण्यांत आले. आज ही संस्था १०६ वर्षांची झाली आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मुंबईचा विकास झाल्याने आणि त्या तुलनेत गोमंतकांत व्यक्तिगत विकासासाठी साधने उपलब्ध नसल्याने उच्च शिक्षण, नोकरी – धंद्यासाठी, थोडक्यांत सर्वांगीण उत्कर्षासाठी, गोमंतकीय होतकरू तरुणांनी मुंबईस येण्याचा मार्ग स्वीकारला. गोमंतकीय हिंदुना मराठी भाषेची अडचण नव्हती व मुंबई गोव्याहून त्या मानाने जवळ असली तरी आपल्या कुटुंबापासून दूर राहणे युवकांना अवघड होत होते, एकाकीपणा जाणवत होता.

त्या काळी आजच्या सारखी संपर्क - साधने नव्हती. पत्र पाठवणे हाच एक संपर्काचा मार्ग होता. त्यामुळे मुंबईला आलेल्या तरुणांची मानसिक घालमेल होणे क्रमपात्र होते. हिंदु तरुणांचे गिरगांव भागांत वास्तव्य तर ख्रिस्ती गोमंतकीयांचे धोबीतलाव परिसरांत स्थायिक होते. हिंदूंच्या उलट ख्रिस्ती समाज बऱ्याच प्रमाणांत संघटित राहू शकला याचे कारण चर्च, धार्मिक प्रवचने, धार्मिक -सामाजिक सभागृहे, रोमी लिपीतून प्रसिद्ध होणारी नियत कालिके, वृत्तपत्रे आणि त्यांच्यासाठी असलेली राहण्याची व्यवस्था (कूड). संस्थेच्या संस्थापकांनी हे जाणले आणि धि गोवा हिंदु असोसिएशनची स्थापना केली जेणेकरून हिंदु गोमंतकीयांना संघटित होता येईल, विचारांची देवाण - घेवाण होईल, मानसिक स्थैर्य लाभेल आणि मुख्य म्हणजे एकाकीपणा दूर होईल.

**संस्थेची उद्दिष्टे**

१९१९ -२०२० वर्षासाठी संस्थेचे पहिले कार्यकारी मंडळ निवडण्यांत आले. अध्यक्ष - श्री. मंगेश रामचंद्र बस्तोडकर, उपाध्यक्ष - डॉ. व्यंकटेश पांडुरंग कामत, सं. चिटणीस- श्री. सखाराम वामन शिरगावकर, श्री. वैकुंठ शिवराम शिरवईकर, सं. खजिनदार - श्री. वामन रघुनाथ वर्दे वालावलीकर, श्री. एस. एम. गायतोंडे, सभासद - श्री. विष्णू श्रीधर बोरकर, श्री. अनंत दत्तोबा आमोणकर, श्री शंकर जगन्नाथ कारापुरकर, श्री. व्यंकटराव वामन गायतोंडे, श्री. नागू देऊ राऊत हे पहिल्या कार्यकारिणीचे पदाधिकारी होते. त्याच वर्षी, ७ डिसेंबर, १९१९ ला संस्थेची घटना आणि नियमावली मंजूर करण्यांत अली. घटनेच्या अंतर्गत, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रम हि संस्थेची उद्दिष्टे राहतील असे नमूद करण्यांत आले. संस्थेच्या स्थापनेमुळे गोमंतकीयांना स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव झाली, स्वत:चे असं व्यासपीठ मिळाले.

खरं तर संस्था सुरू करणे सोपं असते पण ती कार्यरत ठेवणे व कार्याचा उत्तरोत्तर आलेख वाढवणे अतिशय कठीण काम असते. त्यासाठी अनुभवी, बुद्धिमान व दूरदृष्टी असलेल्या नेतृत्वाची आवश्यकता असते. संस्थेच्या सौभाग्याने, संस्थेला डॉ. व्यंकटेश पां. कामतां सारखे नामांकित डॉक्टर, समाजसेवक आणि कल्पक नेतृत्वाची जाण असलेले संस्थापक लाभले, त्यामुळे आरंभा पासूनच संस्थेच्या कार्याला योग्य दिशा व गती मिळाली. पुढे श्री. जगन्नाथ स. सुखटणकर, श्री. व्यं. ना. नाईक, श्री. अवधूत गुडे, श्री. रुद्राजी शंकर केंकरे, श्री रामकृष्ण नायक, यांचे समर्थ नेतृत्व संस्थेला लाभले आणि संस्थेची यशस्वी वाटचाल सुरू

झाली. 'एकमेकां साहाय्य करू अवघे धरू सुपंथ' हे संस्थेचे ध्येयवाक्य १९२८ साली अस्तित्वांत आले व १९३४ साली सहकारितेचे चिन्ह निश्चित करून स्वीकारण्यांत आले. १९४० साली सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० अंतर्गत संस्थेची नोंदणी करण्यांत आली आणि संस्था खऱ्या अर्थाने नोंदणीकृत सेवाभावी संस्था बनली. त्यानंतर बॉम्बे पब्लिक ॲक्ट १९५० अन्वये पण संस्थेची नोंदणी झाली.

**सामाजिक उपक्रम**

सुरवातीच्या काळात विविध समित्यांची स्थापना केली गेली. त्यानंतर अभ्यासपूर्वक प्रदर्शने, वार्षिक सहली वगैरे कार्यक्रम आयोजित केले गेले. या मागे संस्थेस प्रसिद्धी मिळावी हा विचार तर होताच पण गोमंतकीय तरुण कार्यकर्ते संस्थेशी आकर्षित व्हावे, जोडले जावे अशीही मनोमन इच्छा होती. समाज प्रबोधनासाठी व्याख्यानमाला, परिसंवाद, शिबिरे, विविध स्पर्धा, भाषा वर्ग असे उपक्रम सुरु केले गेले. सुरवातीस, विशेष कार्य करून यश कीर्ती प्राप्त केलेल्या गोव्यातील किंवा गोव्याबाहेरील गोमंतकीयांना सन्मानाने आमंत्रित करून त्यांचा जाहीर सत्कार करण्यात येत असे. त्याचप्रमाणे, स्पर्धात्मक परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या विध्यार्थ्यांना त्यांच्या पुढील सकारात्मक वाटचालीसाठी उत्तेजन देण्यासाठी जाहीर सत्कार करण्यात येत असे. १९५८ साली, पुणे येथे स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांसाठी वसतिगृहाची पण व्यवस्था करण्यांत आली.

हळूहळू संस्थेची कार्ये वाढू लागल्या कारणाने संस्थेला जागा अपुरी वाटू लागली. चिराबाजार येथील 'माला बिल्डिंग', चर्नीरोड वरील 'सुरतवाला बिल्डिंग', 'मोहन बिल्डिंग', 'मेहता सदन' असा संस्थेचा प्रवास चालू होता. त्रिभुवन रोड वरील 'मेहता सदन' या इमारतीमधून वर्ष १९२६ पासून ३३ वर्षे संस्थेचे कार्य चालू होते. त्या नंतर, १९५९ साली संस्था, डॉ. दादासाहेब भडकमकर मार्गावरील (लॅमिंगटन रोड) 'वकील टेरेस' येथे म्हणजे आजच्या 'गोमंतधाम' इमारतीत स्थिरावली.

चार मजली गोमंतधाम इमारतीत कार्यालय थाटल्या नंतर एक तर जागेचा प्रश्न सुटला आणि बरीच सभासद नोंदणी पण झाली. संस्थेच्या कार्यात भाग घेण्यास उत्सुक असलेल्या कार्यकर्त्यांची संख्या वाढू लागली आणि खऱ्या अर्थाने संस्थेच्या उपक्रमांना गती मिळाली, संस्था बहरू लागली. महिला समिती, रुग्ण चिकित्सा केंद्र व पॅथॉलॉजिकल लॅबोरेटरी, कै. नलिनी पाणंदीकर व्यवसाय आणि बाल मार्गदर्शन केंद्र, गोमंतधाम इमारतीत आल्यानंतर दुसऱ्या मजल्यावरील मोकळया जागेत गोमंतकीय विद्यार्थ्यांची राहण्याची सोय, शशिकला वशी व्याख्यान माला, पुस्तक प्रकाशन, फिझिओ-थेरपी आणि अपंग पुनर्वसन केंद्र मडगाव - गोवा, न्यूरो -थेरपी आणि नेत्ररोग विभाग, बाल आणि पालक मार्गदर्शन केंद्र असे अनेक सामाजिक उपक्रम हाती घेण्यांत आले. कालानुरूप आवश्यकता नसलेले उपक्रम बंद करून नवे उपक्रम हाती घेण्यांत आले.

पूर्वी, एकत्र कुटुंब पद्धती असल्या कारणाने कुटुंबातल्या वृद्ध व्यक्तींना त्याच्या वृद्धपकाळात कुटुंबाचा आधार असायच्या. यथायोग्य देखभाल आणि काळजी घेतली जायची व त्यांचा योग्य आदर सन्मान केला जायचा. काळ बदलला, विभक्त कुटुंब पद्धती स्वीकारली गेली, समाजात रुळली तसे कुटुंबातल्या वृद्धांचे स्वकीयांना ओझे वाटायला लागले. या सामाजिक परिस्थितीचा आढावा घेतल्या नंतर १९८२ साली संस्थेने बांदिवडे - गोवा येथे 'धि गोवा हिंदु असोसिएशन स्नेहमंदिर' या वृद्धांसाठीच्या संस्थेची स्थापना केली. आज ती संस्था एक स्वायत्त संस्था आहे व अतिशय उत्तम रित्या संस्थेचे कार्य चालू आहे.

संस्थेचे नावांत 'हिंदु' हा शब्द असल्याने, बऱ्याचदा ही संस्था फक्त हिंदूसाठीच आहे कां? असा प्रश्न विचारला जातो. मुळांत, ही संस्था गोमंतकीय हिंदूंना संघटित करण्यासाठी स्थापित केली गेली असली, तरी १९७० साली संस्थेच्या घटनेत मूलभूत बदल करण्यांत आला आणि संस्थेचे सभासदत्व जाती - धर्म निरपेक्ष सर्वांसाठी खुले करण्यांत आले. आज धि गोवा हिंदु असोसिएशन ही जाती - धर्म

निरपेक्ष, गोमंतकीयां साठीची संस्था आहे. संस्थेचे सदस्यत्व देताना कधीही जात-पात, धर्माचा विचार केला जात नाही हे महत्वाचे. २००१ साली, गोमंतकीय व्यक्तींना वैद्यकीय तपासणी आणि उपचार यासाठी आर्थिक योजना अंमलात आणली गेली. आज ती योजना जाती, धर्म, प्रांत निरपेक्ष, थोडक्यांत समाजातल्या सर्व घटकांसाठी उपलब्ध आहे. मेडी हेल्प आणि जीवन साहाय्य अश्या दोन पुस्तिका गरजु रुग्णांसाठी संस्थेने प्रकाशित केल्या आहेत, त्यांत रुग्णांना आर्थिक मदत देणाऱ्या संस्थां पासून, रुग्णालये, रक्तपेढ्या, वृद्धाश्रम आणि इतर माहिती उपलब्ध आहे. त्यामुळे, ही संस्था सर्व सभासदांच्या जीवभावाची संस्था आहे. असे सभासद, कार्यकर्ते संस्थेस लाभणे हे कुठल्याही संस्थेचे मोठे भाग्य असते.

### शैक्षणिक उपक्रम

देशाची उन्नती, समाजाच्या प्रगतीवर आधारित असते आणि समाजाची प्रगती संस्कारांवर आणि शिक्षणावर अवलंबून असते. माणसाचे आचार, विचार, उच्चरावरून माणसावर झालेले संस्कार आणि त्याची शैक्षणिक पात्रता दिसून येते. याच गोष्टींचा सखोल विचार करून, संस्थेने विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्राधान्य देण्यास सुरवात केली. गरजू आणि होतकरू मुलांना शिक्षणसाठी शिष्यवृत्ती , विद्यार्थ्यांना प्रोत्साहनार्थ पारितोषिके असे उपक्रम संस्थेच्या कार्यकारी मंडळाने सुरु केले जे आजतागायत चालू आहेत. फक्त दहावीपासून पदवीपर्यंतच नव्हे तर पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पण शिष्यवृत्ती देण्यांत येतात. या शिष्यवृत्ती, संस्थेच्या सभासदांनी आपल्या प्रिय व्यक्तीच्या नावे दिलेल्या देणग्यांच्या व्याजातून दिल्या जातात. संस्थेच्या १०६ वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडांत शेंकडो विद्यार्थ्यांनी या सवलतीचा लाभ घेऊन आपली कारकीर्द घडवली याचा संस्थेला आणि संस्थेच्या कार्यकारी मंडळाला सार्थ अभिमान आणि आनंद आहे. संस्थेचे ज. स. सुखटणकर संदर्भ ग्रंथालय, वाचनालय, सामान्य वाचकांना आणि विद्यार्थ्यांना सेवा देत आहे. संस्कार, शिक्षणामुळे माणूस घडतो तर वाचनामुळे माणसाला योग्य दिशा मिळते, माणूस प्रगल्भ होतो. कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी, सभासद आणि कार्यकर्त्यांच्या अथक प्रयत्नामुळे संस्थेस हा उपक्रम पूर्णत्वास नेणे सुकर झाले.


### सांस्कृतिक उपक्रम

गोमंतकीय माणूस हा मुळांत कलासक्त. संगीत, नाट्यप्रेम, साहित्य, त्याच्या रोमारोमात भिनलेले. गोव्यात स्थानिक हौशी कलाकार नाट्य प्रयोग करायचे, संगीताच्या मैफिली घडून यायच्या. गोव्याच्या लाल मातीचा गुण म्हणजे जनतेला जन्मजात सूर, ताल, लय आणि अभिनयाची देवदत्त देणगी. धि गोवा हिंदु असोसिएशनने संस्थेच्या वार्षिक संमेलनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम करून संस्थेच्या सभासदांची आंतरिक आवड जोपासण्याचा प्रयत्न केला.

१९२७ च्या वार्षिक संमेलनांत संस्थेने शेणै गोयंकार (वामन वर्दे वालावलकर) लिखित 'मोगाचे लग्न' हे कोकणी नाटक सादर केले. १९५२ साली संस्थेचा रौप्य महोत्सव थाटामाटात साजरा करण्यांत आला. ६ दिवसाच्या या महोत्सवांत काही नाट्यप्रयोग उत्कृष्टपणे सादर करण्यांत आले. यांत सभासद आणि उत्साही तरुण कार्यकर्त्यांच्या सहभागामुळे महोत्सव आणि सादर केलेल्या नाट्यप्रयोगांना अत्युत्तम प्रतिसाद मिळाला. त्यानंतर, १९५५ साली संस्थेने राज्य नाट्यस्पर्धेत प्रथमच सादर केलेल्या शं. प. जोशी लिखित, मास्टर दत्ताराम दिग्दर्शित 'खडाष्टक' नाटकास प्रथम पारितोषिक आणि अनेक वैयक्तिक पारितोषिके प्राप्त झाली. त्यानंतर गो. ब. देवल लिखित, गोपीनाथ सावकार दिग्दर्शित, संगीत संशय कल्लोळ हे नाटक, १९५६ साली राज्य नाट्य स्पर्धेत सादर केले गेले व सलग दुसऱ्या वर्षी संस्थेचे नाटक प्रथम पारितोषिकाचे मानकरी ठरले. त्याच प्रमाणे दिग्दर्शनाचे द्वितीय पारितोषिक - दिग्दर्शक गोपीनाथ सावकार याना, रामदास कामत- संगीताचे पारितोषिक, रघुवीर नेवरेकर आणि आशालता वाबगावकर यांना अभिनयाची पारितोषिके अशी अनेक पारितोषिके संस्थेने सादर केलेल्या या नाटकाने पटकावली.

त्याच वर्षी दसऱ्याच्या मुहुर्तावर कलाविभागाची स्थापना झाली. श्री. सदाशिव उर्फ अवधूत गुडे, श्री. रामकृष्ण नायक, श्री. दीनानाथ दलाल, श्रीमती प्रफुल्ला डहाणूकर, श्री. मोहनदास सुखटणकर, श्री. भिकू पै आंगले, श्री. सतीश म्हापसेकर, श्री. देवदत्त मणेरीकर, श्री. प्रभाकर शिरवाईकर, हे कलाविभागाचे शिल्पकार, संस्थापक आणि आधारस्तंभ. त्यांच्या दूरदृष्टीमुळे आणि अविरत परिश्रमामुळे कलाविभाग बहरला, फुलला. कलाविभागा मुळेच संस्थेची ओळख सर्वदूर पसरली गेली म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

कुठलंही कार्य हाती घेतल्या नंतर यश सहजा- सहजी मिळत नसते तर त्यासाठी दूरदृष्टी असावी लागते. वाटेवरून चालताना खाच - खळगे असतात त्याची जाणीव ठेवावी लागते आणि व्यवहार करावा लागतो. हेच यशाचे खरं गमक. गोवा हिंदुच्या संस्थापकांनी सचोटीची, सेवावृत्तीची, विश्वासहार्यता जपण्याच्या आवश्यकतेची सभासदांना आणि कार्यकर्त्यांना जाणीव करू दिली ........ क्रमशः



# शंभराहून अधिक नाटकांचा अनुभव आणि प्रयोगाचा ध्यास: दिग्गज दिग्दर्शक विजय केंकरे यांची विशेष मुलाखत

**मुलाखतकार : जितेश सावंत (सेक्रेटरी व संपादक, 'गोमंत तरंग')**

'धि गोवा हिंदु असोसिएशन'च्या 'गोमंत तरंग' या त्रैमासिकाचा हा पहिला अंक प्रकाशित करताना आम्हाला विशेष अभिमान वाटत आहे. हा क्षण दुहेरी आनंदाचा आहे, कारण प्रदीर्घ काळानंतर संस्थेची 'सुभेदार गेस्ट हाऊस' ही नवीन नाटक निर्मिती रंगभूमीवर दिमाखात अवतरली आहे. ही केवळ एक निर्मिती नसून एका समृद्ध सांस्कृतिक वारशाचे पुनरुज्जीवन आहे.

या ऐतिहासिक निमित्ताने, ज्यांच्या दिग्दर्शकीय कारकिर्दीने शंभराहून अधिक नाटकांचा टप्पा ओलांडला आहे आणि जे सध्या संस्थेचे उपाध्यक्ष म्हणून धुरा सांभाळत आहेत, असे दिग्गज दिग्दर्शक आदरणीय विजय केंकरे आज आपल्यासोबत आहेत. विशेष म्हणजे, त्यांच्याच कसदार दिग्दर्शनाखाली संस्थेचे हे नवीन नाटक आकारास आले आहे. केंकरे घराण्याचा कलात्मक वारसा, आधुनिक रंगभूमीची आव्हाने आणि संस्थेच्या समृद्ध परंपरेविषयी साधलेला हा विशेष संवाद...

**१) मराठी रंगभूमीशी तुमचं नातं बालपणापासूनच जुळलेलं आहे. अभिनय आणि दिग्दर्शनाच्या प्रवासाची सुरुवात कशी झाली?**

माझा रंगभूमीशी माझा संबंध सुरुवातीला प्रेक्षक म्हणून आला आणि आला तो अगदी माझ्या बालपणापासून. कारण माझे वडील दामू केंकरे, आई ललिता केंकरे, मावशी सुधा करमरकर, आत्या माया गुजर हे सगळे नाटकातच होते त्यामुळे नाटकं बघण्याची सुरुवात फार बालपणापासून झाली. माझे आजोबा, (आईचे वडील) दि. बी. आमोणकर ज्यांना आम्ही तात्या म्हणत होतो ते देखील साहित्य संघाच्या निर्मितीपासून तिथे होते म्हणून लहानपणापासूनच मुंबई मराठी साहित्य संघाशी फार जवळचा संबंध आला. तात्यांमुळे साहित्य संघात संगीत नाटकं बघणं हे नेहमी ठरलेले असायचे, अगदी आठवड्यातून दोनदा तरी हे घडतच असे. त्यामुळे नाटक बघण्याची सवय अगदी लहानपणापासूनच लागली. आणि विशेष म्हणजे माझ्यावरती त्यावेळच्या संगीत नाटकाचा खूप मोठा पगडा आहे.

घरी आई-वडील सतत नाटकाशी संबंधित, घरात मी माझी आजी व त्यावेळेस आमच्याकडे एक नोकर होता जानू नावाचा मी यांच्याच बरोबर असायचो. त्यामुळे मी मनात असा निर्णय घेतला होता की नाटक क्षेत्राकडे वळायचंच नाही.

मला क्रिकेट खेळायला खूप आवडायचे. मी त्या काळामध्ये भरपूर क्रिकेट खेळायचो, जसा शाळेत माझा नाटकाशी संबंध आलाच नाही, तसा कॉलेजमध्येही नाही पण... कॉलेजच्या फायनल इयरला माझा नाटकाशी संबंध आला अभिनेता म्हणून आणि तो ही अपघाती.

मी जसा अभिनेता अपघाताने झालो, तसाच दिग्दर्शकही अपघातानेच झालो. म्हणजे एक दृष्टीने दोन्ही अपघातच. 'देवस्की' चा प्रयोग झाल्यानंतर अचानक पुरुषोत्तम बेर्डे यांनी माझ्यासमोर रघुवीर कुल यांनी लिहिलेली 'इजा बीजा तिजा' नावाची एक एकांकिका ठेवली आणि त्यांनी सांगितलं आपण या मंडळींतर्फे नानासाहेब फाटक एकांकिका स्पर्धेत याची एन्ट्री दिली आहे आणि तुला हे दिग्दर्शित करायचं आहे. मला फार आश्चर्य वाटलं, मी विचारलं त्यांना की तुला असं का वाटलं की मी दिग्दर्शन करू शकेन? तेव्हा त्यांचं उत्तर असं होतं की, देवस्कीच्या तालमी दरम्यान मी ज्या प्रकारचे प्रश्न त्यांना विचारत होतो त्यावरून त्यांना असं जाणवलं की मला तांत्रिक गोष्टींकडे ओढा आहे आणि मी ते दिग्दर्शनात वापरू शकेन. त्या स्पर्धेमध्ये आमची ती एकांकिका ३२ एकांकिकांमधून पहिली आली आणि तिथून माझा दिग्दर्शनाचा प्रवास सुरु झाला.

**२) आधुनिक मराठी नाटकाला तांत्रिक आणि सौंदर्यात्मक प्रगल्भता देणाऱ्या श्री दामू केंकरे यांच्या वैचारिक आणि कलात्मक वारशाचा आपल्या दिग्दर्शनावर कसा प्रभाव पडतो?**



**(दामू केंकरे)**

मी कुठल्याही ट्रेनिंग स्कूल मध्ये जाऊन कधीच नाट्य प्रशिक्षण घेतले नाही. फारशी शिबिरं देखील केली नाहीत, एक माधव वाटवे यांचं 'व्हॉईस आणि स्पीच'चं शिबीर वगळता. त्यानंतर माधव वाटवे यांच्याबरोबर राज्य नाट्य स्पर्धेची अंतिम फेरी झाल्यानंतर, ज्यांना पारितोषिके मिळाली आहेत त्यांच्यासाठी तीन आठवडे किंवा एक महिना मुंबईत व गोव्यात अशी त्या काळामध्ये नाट्य प्रशिक्षण शिबीर होत असे. आता होतात का नाही माहित नाही. त्यासाठी दोन वर्षे मी त्यांना असिस्टंट (साहाय्यक) म्हणून काम केले.

फॉर्मल ट्रेनिंग (औपचारिक शिक्षण) घेतले नाही, याचे आज मला वाईट वाटते. मला वाटते की मी घ्यायला पाहिजे होते. यामुळेच माझ्यावर पुष्कळ लोकांचा इन्फ्लुएन्स किंवा पगडा आहे. पण माझ्या वडिलांच्या दिग्दर्शन शैलीचा प्रभाव निश्चितच आहे, तो मुख्य या प्रकारचा आहे की अभिनेता कसा आहे हे समजून घेऊन त्याप्रमाणे त्याला सांगणे आणि त्या त्या पद्धतीने दिग्दर्शन करणे. थोडक्यात अभिनेता तुमचा मित्र झाला की तुम्ही त्याला व्यवस्थित समजावू शकता आणि ही फार महत्त्वाची गोष्ट मी माझ्या वडिलांकडून अगदी निश्चितपणे शिकलो.

**3) गुरू केवळ तंत्र शिकवत नाही, तर विचारांची बैठक घडवतो या मताशी तुम्ही कितपत सहमत आहात?**

माझ्या वडिलांनी सांगितलेली एक गोष्ट माझ्या डोक्यात भिनलेली आहे , आणि ती म्हणजे विजय, 'चित्रापेक्षा चौकट मोठी होऊ देऊ नकोस', म्हणजे नाटकातला ऐवज कधी डेकोरेट करायचा प्रयत्न करू नकोस. दुसरी गोष्ट म्हणजे अभिनेत्याला स्वत:ची विचार करण्याची एक शक्ती असते, ती त्याला पूर्णपणे वापरू द्यायची ही गोष्ट मी वडिलांकडून शिकलो.

मी विजयाबाई म्हणजेच विजया मेहता यांच्याबरोबर 'लाईफलाईन' सिरीयलमध्ये काम केले, त्यांचा साहाय्यक म्हणून. बारकावे, रूपकं कशी वापरायची ही त्यांची वैशिष्ट्ये एखाद्या गोष्टीत खोल शिरून आणि शब्दाला पूर्णपणे महत्व न देता, महत्व द्यायच्या पण ते शब्द कशासाठी लिहिले आहे, त्याच्या मागे काय रूपके असू शकतात, याचा विचार जो विजयाबाई करत असत तो त्यांची नाटके बघून व 'लाईफलाईन' सिरीयलमध्ये काम करताना त्यांच्याकडून शिकलो.

पंडित सत्यदेव दुबे यांच्याकडून एक महत्वाची गोष्ट शिकलो ती म्हणजे 'इंटेन्सिटी'. तसेच नाटक समोरच्या प्रेक्षकांपर्यंत पोहोचवायचं, उत्तम बोलायचे कसे किंवा इतर तांत्रिक गोष्टींचा अवडंबर न माजवता नाटक थेट प्रेक्षकांपर्यंत कसे पोहोचवायचे हे शिकलो. अजून एक गोष्ट त्यांच्याकडून शिकलो ती म्हणजे 'करते रहो', अच्छा नाटक करने के लिये रुकोगे तो कुछ नही होगा. करते राहो कभी कभी एखाद नाटक अच्छा हो जाता है, ज्यादातार बुरे नाटक होते है. त्यामुळे या सगळ्याच व्यक्तींचा थोड्या प्रमाणात माझ्यावर परिणाम झाल्याने हे सगळेच माझे गुरू आहेत.

**४) मराठी रंगभूमीवर शंभराहून अधिक नाटके दिग्दर्शित करणं हा एक दुर्मिळ विक्रम मानला जातो. या प्रदीर्घ प्रवासाकडे मागे वळून पाहताना आज काय वाटतं?**

मला माहित नाही, मी नाटक करत गेलो. म्हणजे सुरुवातीला जेव्हा मी समांतर प्रायोगिक नाटक केलं, 'आंतरनाट्य' नावाची आमची संस्था होती, त्याच्यातर्फे मी समांतर प्रायोगिक नाटक करत होतो. माझ्याबरोबर त्या काळातली अत्यंत हुशार मंडळी नाटकं करत होती. अरुण नाईक, राजीव नाईक, अजित भुरे, संजय मोने, धनंजय गोरे, तुषार

दळवी, रेणुका शहाणे... कितीतरी असे लोक ज्यांच्याबरोबर आम्ही काम करत होतो आणि अतुल परचुरेही होता. तर ते करताना मजा येत होती.

पण माझं पहिलं व्यावसायिक नाटक केलं खरं तर 'बिघडले स्वर्गाचे द्वार'. पण ते इतक्या कमी अवधीत केलं आणि फार खोलात शिरावं लागेल, ते इथे शिरत नाही, पण दिग्दर्शक म्हणून पहिल्या प्रयोगाला माझं नावच नव्हतं. मी त्यात अर्थात 'नारदाची' भूमिका करत होतो. आणि त्यानंतर तेच नाटक जेव्हा २००१ साली परत झालं, तेव्हा मला निर्मात्याने फोन करून विचारलं की, 'बाबा रे, आता तुझं नाव देऊ का? कारण तू काही नारदाचं काम करायला उपलब्ध नाहीयेस हे माहितीये.मी म्हटलं, 'तुम्हाला आता वाटतंय ना, द्या.' तर तेव्हा माझं नाव त्या नाटकाला २००१ साली लागलं.

परंतु त्यानंतर 'ससा आणि कासव' पासून पुढे मी केलेली सात ते आठ नाटकं व्यावसायिक रंगभूमीवर चालली नाहीत. आणि अचानकपणे 'कार्टी प्रेमात पडली' हे मी रत्नाकर मतकरींचं एक नाटक उदय धुरत या निर्मात्यासाठी केलं, 'माऊली प्रॉडक्शन' आणि अचानक त्याला रवींद्र नाट्य मंदिरला बहुधा १५ ऑगस्ट होता, दुपारचा... बोर्ड लागला हाउसफुल्लचा! आणि तिथे मी पहिल्यांदा दिग्दर्शक म्हणून हाउसफुल्लचा बोर्ड बघितला स्वतःच्या नाटकाला. त्यापूर्वी अभिनेता म्हणून 'टूरटूर' सारख्या नाटकांमधून, 'बिघडले स्वर्गाचे द्वार'मधून तो पाहिला होता. 'बिघडले स्वर्गाचे द्वार'ला खरं तर नाव नसल्यामुळे, पण तो तिथे पाहिला होता.

आणि तेव्हापासून मी नाटक करत गेलो. आणि या प्रवासामध्ये काही फार महत्त्वाची माणसं भेटली. 'आंतरनाट्य' ही संस्था, तिथे रामकृष्ण नायक आणि त्यांचे सर्व सहकारी. मी पुढे नाटक जसं करत गेलो तसं आमच्या संपूर्ण करिअरमध्ये महत्त्वाचा वाटा म्हणजे सुधीर भट आणि त्यांची 'सुयोग' नावाची संस्था. हे नसते तर मी इतकी नाटकं करूच शकलो नसतो. सुधीर भटांनी आणि गोपाळ अलगेरी त्यांच्या पार्टनरने आमच्यावर दाखवलेला विश्वास, म्हणजे एका अर्थाने ते आयुष्यभराचं ऋण आहे की सुधीर भटांमुळे आमची करिअर झाली.

त्यानंतर 'चंद्रलेखा', मोहन वाघ. मोहन काकांसाठी मी त्यानंतर भरपूर नाटकं केली. ती करताना सुद्धा मजा आली, सांगण्याचा मुद्दा म्हणजे सातत्य... मग मी 'बदाम राजा प्रॉडक्शन' साठी नाटक केलं, निनाद कर्पे, विनायक गव्हांदे यांची मी चार-एक नाटकं त्यांच्याबरोबर केली. मग मी 'प्रवेश' नावाची माझी स्वतःची नाट्यसंस्था सुरू केली. पण मागे बघताना असं वाटतं की, मला कल्पना नाही मी जे काही करत होतो ते खरंच किती चांगलं होतं, परंतु या सगळ्यांच्या सहकार्यामुळे मी १०० च्या वर, म्हणजे आता ११०-११५ नाटकं मी करू शकलो.

आणि पुन्हा एकदा 'सुभेदार गेस्ट हाऊस' च्या निमित्ताने 'गोवा हिंदू असोसिएशन' या माझ्या लाडक्या आणि जुन्या संस्थेशी परत संबंध आला, त्याबद्दल खूप खूप आनंद आहे. तसंच आता 'मुंबई मराठी साहित्य संघ' या माझ्या अगदी बालपणीच्या जडणघडणीतल्या संस्थेशीही माझा संबंध येऊ घातलाय, मी त्यांच्याबरोबर पुढचं नाटक करणार आहे.

**५) प्रत्येक नाटकागणिक स्वतःची सर्जनशीलता (Creativity) ताजी ठेवण्याचं आणि कामातील शिस्त' टिकवून ठेवण्याचं रहस्य काय आहे?**

ताजेपणाबद्दल जर म्हणाल तर मला अस वाटत, एक तर मी खूप नाटक बघतो. माझं स्वतःचं बाहेरून, मला बघता येत नाही परंतु इतरांची खूप नाटकं बघतो. आणि सगळयात महत्त्वाची गोष्ट म्हणजे साधारणपणे मी नाटकं करत होतो करत होतो आणि २००३ च्या सुमारास वामन केंद्रेंमुळे माझा मुंबई विद्यापीठाशी संबंध आला आणि तिथे मी दिग्दर्शन शिकवायला लागलो. आणि त्याच्या आधी खरं तर ललित कला केंद्रामध्ये सतीश आळेकरांमुळे. ललित कला केंद्राच्या बाबतीत काय व्हायचं प्रत्येक वेळेस जितकं रेगुलरली मुंबई विद्यापीठात गेलो, तितकं रेगुलरली ललित कलात जाणं जमत नव्हतं. परंतु तरीही याने महत्त्वाची गोष्ट माझ्या आयुष्यात घडली, तो म्हणजे पुढच्या पिढीशी जवळून संपर्क. पुण्यामध्ये गावातल्या मुलांशी खूप संपर्क आला आणि मी त्यांच्याशी मैत्री करत असल्यामुळे मला गावातली

मुलं कळली, त्यांना शहरातला माणूस कळला. आणि मुंबई विद्यापीठामध्ये तर देशातल्या सर्व भागांतून मुलं येत होती, तसंच परदेशातून सुद्धा मुलं तिथे शिकायला येत होती. तर त्यामुळे मला पुढची पिढी विचार कसा करते, त्यांचं म्हणणं काय, नक्की त्यांचा दृष्टिकोन काय रंगभूमीकडे पाहण्याचा, या सगळया गोष्टी मला जाणवल्या आणि तिथे कदाचित एक ताजेपणा शिल्लक राहिला याचं सगळं श्रेय या पुढच्या पिढीशी संपर्क आला त्याला आहे. ताजेपणाचं श्रेय माझ्या शिक्षक म्हणून जे काही मी वर्ष घालवली त्याला आहे. माझ्या आयुष्यात जर काही शिस्त आली असेल, तर त्याचं सगळ श्रेय डॉक्टर श्रीराम लागू, अशोक सराफ, दिलीप प्रभावळकर या माझ्या सगळया कलाकार मित्रांना जातं आणि अर्थात नवीन पिढीत सुमित राघवन. तर या लोकांना ते जातं आणि त्यामुळे मजा आली हे सगळं करायला इतकी वर्षं..

**६) दिग्दर्शक म्हणून तुमची कार्यपद्धती कशी असते?**

मी फार अशी टोकाची शिस्त पाळणारा माणूस नाही. खरं तर मी अगदी बेशिस्त नाही, परंतु मी बऱ्यापैकी बेशिस्त आहे. म्हणजे वेळ न पाळणे वगैरे इतकं नाही होत, परंतु जरा गंमत गंमत करत नाटक करण्याकडे दिग्दर्शक म्हणून माझा कल आहे. आणि तो सुद्धा बदल मागच्या काही वर्षांत जास्त झाला, म्हणजे मी जेव्हा 'सुंदर मी होणार' वगैरे अगदी सुरुवातीच्या काळामध्ये ९५-९६ सालापर्यंत 'ढोलताशे' नाटक केलं आविष्कारसाठी, तिथपर्यंत मी जरा तरी आग्रही आणि थोडा थोडा चिडचिडा होतो. पण त्यानंतर अजिबातच नाही, तर सगळयांना सामावून घेऊन सर्वसमावेशक गोष्टी करणे हा कधीकधी मोठा दोषही असू शकतो परंतु तो माझ्यात आहे. परंतु माझी कार्यपद्धती अशीच आहे.

**७) दिग्दर्शक म्हणून नाटकाची संहिता निवडताना तुम्ही कोणत्या बाबींना सर्वाधिक प्राधान्य देता?**

संहिता निवडताना तो विषय प्रेक्षकांना किती खिळवून ठेवेल आणि त्यातून काहीतरी नवीन देता येईल का, हे मी प्रामुख्याने पाहतो.

**८) 'सुभेदार गेस्ट हाऊस' या नाटकाच्या शीर्षकातूनच एक कुतूहल निर्माण होतंय, या नाटकाचा बाज नेमका कसा आहे आणि प्रेक्षकांसाठी यात विशेष काय असेल?**

सुभेदार गेस्ट हाऊस' हे 'द माऊसट्रॅप' या अगाथा क्रिस्टींच्या जगप्रसिद्ध नाटकावर आधारित आहे, शिरीष देखणे यांनी त्याचं मराठी रूपांतर केलंय. साधारणपणे लंडनमध्ये मागची ७२-७३ वर्षं हे नाटक चालू आहे. जगात सर्वात जास्त प्रयोग झालेलं हे नाटक आहे. या नाटकाला सस्पेन्स थ्रिलर्स मधला क्लासिक' मानतात. 'गोवा हिंदू असोसिएशन' ची पूर्वीची नाटकं पाहता, आत्तापर्यंत आम्ही 'सस्पेन्स थ्रिलर' या जॉनरला कधी हात घातला होता असं माझ्या तरी स्मरणात नाही त्यासाठी मी हे नाटक 'गोवा हिंदू' सारख्या संस्थेसाठी करायला जास्त उत्सुक होतो. सगळयात जास्त प्रयोग झालेलं नाटक आणि या नाटकाच्या बाबतीत दोन आठवणाऱ्या गोष्टी म्हणजे त्यातली एक तर याच्या पहिल्या प्रयोगाचे प्रमुख पाहुणे विन्स्टन चर्चिल होते, म्हणजे आपल्याला कल्पना येईल की किती वर्षं जुनं हे नाटक आहे. आणि यातला इन्स्पेक्टर जो खून शोधून काढतो, त्या इन्स्पेक्टरचं काम पहिल्या प्रयोगात रिचर्ड ॲटनबरोने केलं होतं, म्हणजे असं त्याला ऐतिहासिक महत्त्व सुद्धा आहे. आणि हे नाटक सस्पेन्स थ्रिलर आहे, 'हु डन इट' (Who done it) प्रकारचं, म्हणजे खून कुणी केला? आणि नाटकात आठ पात्रं आहेत, त्यापैकी कुणीही खून केलेला असू शकतो. त्यांच्यापैकी कुणीतरी स्वत: केलाय किंवा घडवून आणलाय. त्यामुळे हे नाटक सस्पेन्स थ्रिलर आहे, सतत प्रेक्षकाला विचार करायला लावणारं की हा कुणी असेल की हा कुणी, त्यामुळे त्यांची उत्सुकता, उत्कंठा ताणलेली राहते, अशा प्रकारचं हे नाटक आहे. त्यामुळे हे नाटक माझ्या संस्थेकरिता करताना खूप मजा आली

**९) अनेक वर्षांनंतर संस्थेचं नाटक पुन्हा रंगभूमीवर येत आहे आणि तुम्ही स्वत: त्याचे दिग्दर्शन करत आहात. यापूर्वी तुमचे वडील श्री दामू केंकरे यांनीही संस्थेसाठी**

**अनेक नाटके दिग्दर्शित केली होती. त्या समृद्ध परंपरेचा वारसा पुढे नेताना हा क्षण तुमच्यासाठी किती भावनिक आहे?'**

सुभेदार गेस्ट हाऊस' च्या निमित्ताने 'गोवा हिंदू असोसिएशन' या माझ्या लाडक्या आणि जुन्या संस्थेशी पुन्हा संबंध आला, त्याबद्दल खूप आनंद आहे. वडिलांनी या संस्थेसाठी अनेक नाटकांचे दिग्दर्शन केले आहे, तो समृद्ध वारसा पुढे नेणं ही माझ्यासाठी मोठी जबाबदारी आणि भावनिक गोष्ट आहे. वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवून संस्थेसाठी काम करताना एक वेगळंच समाधान मिळतं.

**१०) संस्थेचे उपाध्यक्ष म्हणून नाटक आणि सांस्कृतिक उपक्रमांना प्रोत्साहन देताना तुम्ही कोणती दृष्टी ठेवता ?**

संस्थेचे पुढील कार्य केवळ मीच संस्थेसाठी नाटक करीन असे नाही, तर मराठी रंगभूमीवरची सर्वात महत्त्वाची आणि दर्जेदार नाटकं करणारी संस्था म्हणून 'गोवा हिंदू असोसिएशन'ची जी पुण्याई आहे, ते कार्य पुढे नेण्याचा प्रयत्न मी माझ्या परीने करीन. नवनवीन माणसं या संस्थेशी कशी जोडली जातील आणि ही संस्था अधिक व्यापक कशी होईल, याकडे मी प्रामुख्याने लक्ष देईन.

**११) गोव्यातील रंगभूमी आणि सांस्कृतिक चळवळीचे आजचे स्थान आपण कसे पाहता?**

गोव्यामध्ये मी कला अकादमीच्या रेपरट्रीसाठी (Repertory) जाऊन स्वत: नाटक केलं होतं, 'प्रेमा तुझ्या मोगा खातीर'. त्याच्या आधी खूप वर्षांपूर्वी मी एक 'आलिया भोगासी' नावाचं मराठी नाटक केलं होतं. आणि आता नॅशनल स्कूल ऑफ ड्रामाच्या मुलांना घेऊन गेलो गोव्यामध्ये २०२२ साली आणि त्यांना घेऊन शेक्सपिअरचं 'कॉमेडी ऑफ एरर्स' केलं आणि ते करताना गोव्यातले सगळे फोक फॉर्म्स त्यात वापरले. त्यानिमित्ताने रोज एक अर्धा दिवस लेक्चर आणि त्यानंतर तालीम अशा स्वरूपाचा उपक्रम केला. विनायक खेडेकरांसारखी मोठी मोठी मंडळी येऊन तिथे आमच्याशी संवाद साधून गेली, त्यामुळे मला असं वाटतं की गोव्याच्या रंगभूमीमध्ये ज्याला आपण म्हणू की फोक किंवा तिथले वेगवेगळे जे प्रकार आहेत त्यांचा फ्लेवर गोव्याच्या रंगभूमीवर आहे. अतिशय कानाला गोड लागणारी अशी आमची कोकणी भाषा आहे. आणि शिवाय गोवा हे एका दृष्टीने मॉडर्न सुद्धा आहे. म्हणजे आजच्या रंगभूमीशी सुद्धा गोव्याचा जवळून संबंध आहे. मागची तीन वर्षं तर राज्यनाट्य स्पर्धेत गोव्याचं नाटक पहिलं आलंय. तर गोव्याची मुलं हल्ली राष्ट्रीय नाट्य विद्यालयात असतात, मुंबई विद्यापीठात असतात, तसंच टेलिव्हिजनच्या निमित्ताने सुद्धा गोव्यातली मुलं मुंबईत येतात अशोक फळदेसाई असेल, सायंकीत कामत असेल, आणखीनही बरीच मुलं येऊन ती आपला ठसा उमटवतायत. त्यानंतर नारायण खराडे, दक्षा शिरोडकर वगैरे असंख्य, आता नावं घ्यायचं ठरवलं तर खूप आहेत. गोव्यामध्ये राजदीप नाईक नावाच्या माणसाने तर पॅरलल व्यावसायिक नाटकंच सुरू केली. पुंडलिक नायक सारखा सगळया गोष्टी हलवून टाकणारा नाटककार गोव्याच्या रंगभूमीवर आहे. म्हणजे त्यांचं 'श्री विचित्राची जात्रा' नाटक बघितल्यानंतर आपल्या लक्षात येतं की किती स्ट्राँग स्टेटमेंट करणारा हा नाटककार आहे. मग विष्णू सुर्या वाघ सारखे कवी, नाटककार डॉक्टर प्रकाश वझरीकर भरपूर अशी मी नावं घेईन. तर गोव्याची रंगभूमी ही पूर्वीपेक्षा आता हळूहळू सर्वसमावेशक आणि प्रगल्भ व्हायला लागली आहे असं मला वाटतं आणि ती तशीच होत राहणार असं माझं वैयक्तिक मत आहे, कारण गोव्यामध्ये चांगली नाट्यगृहं आहेत. आता कला अकादमीची डागडुजी पुन्हा सुरू आहे तर तेही त्याच्या पूर्वरूपात पुन्हा येईल अशी खात्री आहे. आणि अशी पाच-सहा उत्तम नाट्यगृहं असलेलं राज्य आहे गोवा, त्यामुळे गोव्यामध्ये नाटक उत्तम होतंय आणि ते उत्तम होत राहणार.

**१२) डिजिटल आणि ओटीटीच्या युगात मराठी रंगभूमीसमोर कोणती आव्हाने उभी आहेत असे आपल्याला वाटते ?**

पहिल्यांदा जेव्हा चित्रपट आला तेव्हा नाटक बंद पडेल असं वाटत होतं, मग टेलिव्हिजन आला सुरुवातीला तेव्हा नाटक बंद पडेल असं वाटत होतं, आता डिजिटल प्लॅटफॉर्म झालेत. त्याचा नाटकावरती परिणाम काय होतो ? तर कदाचित कधीकधी थोडेसे लेखक कमी होतात. मग कधीकधी आपल्याला हवे तसे अभिनेते तितका वेळ देऊ शकत नाहीत वगैरे अशा गोष्टींचा परिणाम होतो, परंतु जिवंत कला ही कधीही मरणार नाही. आणि कधीकधी या OTT मुळे आत्ताची गोष्ट तुम्हाला सांगतो कोविड नंतर, जोरात प्रेक्षक नाटकाला येतोय आणि आपल्याकडे इतकी मोठी सस्पेन्स थ्रिलरची परंपरा नव्हती परंतु कदाचित या OTT वरती सस्पेन्स थ्रिलर बघायची सवय लागल्यामुळे आज बऱ्यापैकी सस्पेन्स थ्रिलर्स मराठी रंगभूमीवरती सुरू आहेत. तेव्हा प्रेक्षक ही अशी गोष्ट आहे की तो सर्व गोष्टी ॲबसॉर्ब (absorb) करत असतो. परंतु कितीही तुम्ही म्हणालात तरी जिवंत कला... जे एका सेमिनारमध्ये पृथ्वी थिएटरला बी. व्ही. कारंत असं म्हणाले होते, ते माझ्या दृष्टीने फार महत्त्वाचं आहे की, 'जब तक दो इंसान एक दुसरे से बात करते है, तब तक कभी भी थिएटर नही मरेगा. ये होता है की वो कुछ देर के लिए सो जाता है, उसे जगानेवाला पैदा होता है उसकी राह देखो'. तर आता कोविड नंतर खरंच जगानेवाला पैदा झाला अशी परिस्थिती आहे, तर त्यामुळे OTT चा झालाच तर नाटकाला आत्ता या क्षणाला फायदा होतोय. मला असं वाटतं की जिवंत गोष्ट म्हणजे नाटकामध्ये, नाटक हे सुचवण्याचं आणि चित्रपट हे दाखवण्याचं माध्यम आहे असं माझं मत असल्यामुळे, गोष्टी तुम्ही जितक्या उत्तम पद्धतीने सुचवत राहाल तितके दिवस नाटक तसंच जिवंत राहणार. आणि आपल्याला स्पर्धा कशाची नसते आणि स्पर्धेतून मार्ग काढून पुढे जाण्यातच गंमत असते. आता AI चा सुद्धा धोका आहे इतर माध्यमांना, परंतु तो लाईव्ह आर्ट म्हणजे नाटकाला किंवा इतर कुठल्याही जिवंत कलेला असणार नाही. तेव्हा याच्याशी मारामारी करतच आपल्याला काम करावं लागणार, परंतु हे काही नाटक संपवेल असे माध्यमं आहेत असं आत्ता तरी मला वाटत नाहीये, पुढे काही सांगता येत नाही.

**१३) गोमंत तरंग'च्या वाचकांसाठी आणि आपल्या संस्थेच्या सदस्यांसाठी आपला विशेष संदेश काय आहे ?**

संदेश देणारी माणसं फार मोठी असतात. गोमंत तरंगच्या वाचकांना मी संदेश असं खरंच काही देऊ शकत नाही, माझी ती योग्यता आहे असं मला वाटत नाही. पण मैत्रीत मी एक गोष्ट त्यांच्याशी शेअर करू इच्छितो, ती म्हणजे वाचा... भरपूर वाचा आणि भरपूर बघा. आपल्याला एकच जन्म मिळाला आहे, तो आनंदात घालवा, विचार करा, आपापसात लोकांशी संबंध उत्तम ठेवा, दृष्टिकोन व्यापक आणि सर्वसमावेशक असावा अशी माझी एक साधी अपेक्षा आहे. हा संदेश वगैरे नाहीये, माझ्या सगळया मित्र-मैत्रिणींशी ही गोष्ट फक्त शेअर करतोय.



# सांस्कृतिक अस्मितेचा १०६ वर्षांचा तेजोमय प्रवास: 'धि गोवा हिंदु असोसिएशन' वर्धापन दिन सोहळा

**लेखक: श्री. जितेश सावंत**
(संयुक्त चिटणीस, धि गोवा हिंदु असोसिएशन)

सामाजिक, शैक्षणिक आणि विशेषत: मराठी रंगभूमीच्या क्षेत्रात गेली अनेक वर्षे ध्रुवताऱ्याप्रमाणे मार्गदर्शक ठरलेल्या 'धि गोवा हिंदु असोसिएशन' या संस्थेचा १०६ वा वर्धापन दिन सोहळा दि. १ नोव्हेंबर २०२५ रोजी दादर येथील प्रा. बी. एन. वैद्य सभागृहात अत्यंत दिमाखात संपन्न झाला. शतकोत्तर सहा वर्षांची ही प्रेरणादायी वाटचाल साजरी करताना आम्हा सर्व कार्यकर्त्यांना सार्थ अभिमान वाटत आहे.

या सोहळयाचे अध्यक्षस्थान मराठी चित्रपटसृष्टीचे ज्येष्ठ आणि चतुरस्त्र अभिनेते, पद्मश्री व महाराष्ट्र भूषण श्री. अशोक सराफ यांनी भूषवले. त्यांच्या उपस्थितीने या सोहळयाला वेगळीच उंची लाभली. आपल्या खुसखुशीत आणि खुमासदार अध्यक्षीय भाषणात त्यांनी संस्थेशी असलेल्या अनेक जुन्या व खास आठवणींना उजाळा दिला.

प्रमुख पाहुणे श्री. अनिल खंवटे यांनी आपल्या मनोगतात संस्थेशी असलेल्या जुन्या ऋणानुबंधांना आपुलकीने उजाळा दिला. आपल्या कॉलेज जीवनापासूनचा संस्थेशी असलेला संबंध, तेथील वसतिगृह (Hostel), कलाविभाग आणि त्या काळातील व्यवस्थापकांचा आपलेपणा याबद्दल बोलताना ते भावूक झाले. आपल्या आयुष्यातील जडणघडणीत या संस्थेचा खूप मोठा वाटा असल्याचे त्यांनी यावेळी कृतज्ञतापूर्वक नमूद केले.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते मंगलमय दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष श्री. सुभाष सराफ यांनी आपल्या प्रास्ताविकात २४ ऑगस्ट १९१९ या स्थापना दिनापासूनच्या संस्थेच्या प्रवासाचा आढावा घेतला. त्यांनी 'एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ' या ब्रीदवाक्याचे महत्त्व सांगतानाच, जात-पात, धर्म आणि भौगोलिक सीमा ओलांडून केवळ 'मानव धर्म' पाळणे हेच संस्थेचे मुख्य कर्तव्य असल्याचे ठामपणे नमूद केले. विशेष म्हणजे, याच कार्यक्रमात त्यांनी संस्थेच्या आगामी 'त्रैमासिकाची' संकल्पना सर्वांसमोर मांडली, त्या संकल्पनेला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.

या सोहळयात विविध क्षेत्रांतील दिग्गजांना प्रतिष्ठेचे पुरस्कार प्रदान करण्यात आले: मा. दत्ताराम चतुरस्त्र कलावंत पुरस्कार: ज्येष्ठ आणि चतुरस्त्र अभिनेते श्री. दिलीप प्रभावळकर

पद्मश्री बा. भ. बोरकर स्मृती पुरस्कार: सौ. अन्वेषा सिंगबाळ

श्री. शशिकांत नार्वेकर स्मृती पुरस्कार: श्री. सतीश आळेकर

श्री. अ. ना. म्हाम्ब्रो स्मृती पुरस्कार: सौ. नमन सावंत धावस्कर

श्री. गोपीनाथ सावकार स्मृती पुरस्कार: श्री. गंगाराम नार्वेकर

उदय भेंब्रे कोंकणी ग्रंथ पुरस्कार: डॉ. वामन रा. नायक

पुरस्कार प्राप्त सर्व मान्यवरांनी आपल्या मनोगतातून प्रेक्षकांची मने जिंकली.

कार्यक्रमाच्या दिमाखदार आयोजनासाठी उपाध्यक्ष सौ. निरुपा केणी, श्री. विजय केंकरे, कार्याध्यक्षा श्रीमती स्मिता पर्तगाळकर, कार्योपाध्यक्ष श्री. राजेंद्र पै, संयुक्त चिटणीस श्री. जितेश सावंत व श्रीमती शर्मिला रेडकर आणि संयुक्त खजिनदार श्री. समीर कामत यांचे मोलाचे योगदान लाभले. तसेच श्रीमती रजनी लोटलीकर, श्रीमती रश्मी हळणकर आणि श्री. ओमप्रकाश पिळगावकर यांची मोलाची साथ लाभली. संस्थेच्या कार्यालयाची धुरा सांभाळणाऱ्या श्रीमती पल्लवी राऊत आणि श्री. संजय देसाई यांनीही विशेष परिश्रम घेतले.

पहिल्या सत्राचा समारोप करताना मला सर्वांचे आभार मानण्याची संधी मिळाली. दुसऱ्या सत्रात रसिक प्रेक्षकांसाठी ‘अमर हिंद मंडळ’ निर्मित ‘रेशन कार्ड’ ही पारितोषिक विजेती एकांकिका सादर करण्यात आली, तिला रसिकांची वाहवा मिळली. दादर हिन्दु कॉलनी येथील हे सभागृह प्रेक्षकांच्या उपस्थितीने आणि उत्साहाने ओसंडून वाहत होते.

१०६ वर्षांचा हा प्रवास केवळ एका संस्थेचा नसून, तो प्रत्येक गोमंतकीय आणि मराठी रसिकाच्या अस्मितेचा सोहळा ठरला.

सोहळयाचा आनंद घेण्यासाठी YouTube लिंक: १०६ वर्षपूर्ती सोहळा - धि गोवा हिंदू असोसिएशन

https://www.youtube.com/watch?v=XbpKsmvGizw&pp=2AbXCQ%3D%3D










NKGSB Co-operative Bank Ltd.
(Multi-State Scheduled Bank)
SINCE 1917
108 Years of Banking Excellence
ONE STOP FOR ALL YOUR BANKING NEEDS!
CURRENT ACCOUNT
SHOP LOAN
व्यवसाय कर्ज
BUSINESS LOAN
एमएसएमई लोन
MSME TRADER LOAN
कार लोन
CAR LOAN
POS MACHINES
MULTI CURRENCY TRAVEL CARD
मल्टी-करन्सी ट्रॅव्हल कार्ड
GOLD LOAN
गोल्ड लोन
STUDENT SAVINGS ACCOUNT
स्टुडंट सेविंग्स अकाउंट
FOREX
फॉरेक्स
HNI SAVINGS ACCOUNTS
एचएनआय सेविंग्स अकाउंट
SENIOR CITIZEN ACCOUNT
सीनियर सिटीजन अकाउंट
होम लोन
HOME LOAN
FIXED DEPOSIT
SPECIAL SAVINGS A/C FOR WOMEN
स्पेशिअल सेविंग्स अकाउंट फॉर वूमन
QuickMobil App, Net Banking
PERSONAL CONSUMER LOAN
पर्सनल लोन
SOLAR PANEL LOAN
सोलार पॅनल लोन
WORKING CAPITAL
INSURANCE
इन्शुरन्स
Rupay Platinum Contactless Debit Card
MORTGAGE LOAN
मॉर्टगेज लोन
DEMAT
डिमॅट
डॉक्टर लोन
DOCTOR LOAN
QR CODE FACILITY
क्यूआर कोड सुविधा उपलब्ध
EDUCATION LOAN
शैक्षणिक कर्ज
Fixed Deposit
PERSONAL CONSUMER LOAN
* Terms & Condition apply.
follow us on:
TOLL FREE 18002671917

NORMAN-GADGILL
ARCHITECTS

Ar. Anant GadGil
m.arch.(u.s.a.), m.c.a., a.i.i.a

architects
urban planners
interior designers
project consultants

संदेश

फेब्रुवारी २०२६

'**गोमंत तरंग**' नव्या प्रवासाला हार्दिक शुभेच्छा

'धि गोवा हिंदू असोसिएशन' हि संस्था गेली अनेक दशके कला, संस्कृती आणि सामाजिक बांधीलकी जोपासण्याचे महान कार्य गेली अनेक वर्षे करीत आहे.

हि संस्था केवळ एक वास्तू नसून, अनेक पिढ्यांच्या संस्काराचे केंद्र आणि प्रतिबिंब आहे. आजच्या डिजिटल युगात, संस्थेच्या वैभवाचा वारसा पुढे नेण्यासाठी 'गोमन्त तरंग' हे नवीन ऑनलाईन त्रैमासिक सुरु होत आहे, ही अत्यंत आनंदाची बाब आहे. गोव्याची समृद्ध संस्कृती, कला, साहित्य आणि आधुनिक विचार जगभरातील मराठी आणि गोमंतकीय वाचकांपर्यंत पोहोचविण्यासाठी हे एक उत्तम व्यासपीठ ठरेल, याची मला खात्री आहे.

या पहिल्या ऐतिहासिक अंकाच्या निमित्ताने, संपादक श्री. जितेश सावंत आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांना मी मनापासून शुभेच्छा देतो. 'गोमन्त तरंग' हा उपक्रम यशस्वी होवो आणि त्यातून साहित्याचा एक नवा प्रवाह अखंड वाहत राहो, हीच सदिच्छा!

शुभेच्छुक,

आर्की. **अनंत गाडगीळ**

9, USHA BUILDING, 86 KIDWAI ROAD, WADALA (W) MUMBAI-400031. Tel.: +91 (22) ~~24172826~~ ३१८६५५८
419, SHANIWAR PETH, KAKASAHEB GADGIL ROAD, PUNE-411030.Tel.: +91 (20) 24459494
Email : gadgilarchitects@hotmail.com


**श्री अनंत गाडगीळ महाराष्ट्र साहित्य परिषद पुरस्कार विजेते**
**लेखक मा. आमदार प्रसिद्ध वास्तुविशारद आणि नगररचना शास्त्राचे माजी प्राध्यापक**

# मासिकासाठी आलेल्या शुभेच्छा!

## बरें मागून

थि गोवा हिंदु असोसिएशनन कला विभाग परत सुरू केला ही खबर कळ्ळी तेन्ना खोस जाल्ली. आतां असोसिएशन 'गोमंत तरंग' हें नेमाळें सुरू करता हे खबरेन ती खोस दुपेटीन वाडल्या. गोंयकार हे भाशा-मोगी. गोंयचे मुक्ती मेरेन तांणी देशी आनी परदेशी अश्या चवदा भाशांनी वीस हजारां वयर पुस्तकां बरोवन उजवाडाक हाडल्यांत ही ताची गवाय. आज मेरेन ती परंपरा चालू आसा. दोन गोंयकार साहित्यकारांक ज्ञानपीठ पुरस्कार मेळाला आनी एकल्याक सरस्वती सम्मान आनी कुवेम्पू पुरस्कार मेळयात. साहित्य अकादमीचो पुरस्कार दर वर्सा मेळटा. दुसरें, आज तरणाटे पिळगेतले खूब जाणा बरयतात. तांकांय उजवाडाक हाडपाक साधन जाय. हे फाटभुंयेर असोसिएशनन नेमाळें सुरू करप ही भोव बरी गजाल. लेखकांक तें अभिव्यक्तीचें साधन थारतलेच, ते भायर आज लेखन सुरू करपी कांय जाणा फुडें नामना जोडूंक पावतलीं. घडये 'गोमंत तरंग' नेमाळाचें तेंच उद्दिश्ट आसा. हें उद्दिश्ट फळादीक जावंचें आनी साहित्याच्या मळार गुणांक आनी कर्तृत्वाक पुराय वाव मळचो अशीं मागतां. 'गोमंत तरंगा'क मना-काळजा सावन शुभेच्छा.

**श्री उदय भेम्ब्रे,**
प्रसिद्ध वकील, कोकणी लेखक.
नाटककार आणि संपादक
साहित्य अकादमी पुरस्कार विजते २०१५



थि गोवा हिंदु असोसिएशन ही संस्था एक शतका परस चड काळ मुंबईच्या महानगरांत आपले पांय घट रोवून उबी आसा ही व्हडा अभिमानाची गजाल. मुंबईच्या सांस्कृतीक जडण घडणींत हे संस्थेचो मोलाचो वांटो आसा हाका संस्थेचो कला विभाग गवाय आसा. गोंयकारांक आपलें स्वत:चें अशें व्यासपीठ मेळोवन दिलें आनी कार्यकर्त्यांची एक पिळगी निर्माण केली. गोंयचें संवेदान अभ्यास करतल्यांक संस्थेचें सुसज्ज ग्रंथालय आसा. ह्या ग्रंथालयाचो लाव बरेच संशोधक घेतात. ही नामनेची संस्था आनी म्हजे मदीं नातें आसा. तिचो एक संस्थापक वांगडी स. विष्णु श्रीधर बोरकर हे म्हज्या आज्याचे फाटले भाव. ताचो म्हाका अभिमान आसा.

तुमची संस्था दिसान दीस वाडत राबूं आनी तिच्या योगदानान मुंबई शाराच्या इतिहासांत तिची भांगरा अक्षरान नोंद जावं अशें मागतं.

**– माधव बोरकर, कवी**
साहित्यिक, गोवा कोकणी अकादमीचे माजी अध्यक्ष
२००१ चे भारतीय साहित्य अकादमी पुरस्कार विजेते

## शुभेच्छा!

I have been indeed fortunate to be admitted as the member of a renowned cultural institution 'The Goa Hindu Association'. The Association has been a torch bearer in the field of education and culture and it's profound contribution thereto is unparalleled and had and has deep impact in shaping attitude and consequently mind of the society. All the best wishes to 'GomantTarang' trimonthly online magazine.

**– Adv. Anarkali Keni Agni**
Senior Advocatel

समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी तळमळीने कार्य करणाऱ्या संस्थापैकी अग्रणी असलेल 'धि गोवा हिंदु असोसिएशन' ही संस्था 'गोमंत तरंग' हे ऑनलाईन त्रैमासिक सुरु करीत आहे ही आनंदाची बाब आहे.

या त्रैमासीकाच्या निमित्ताने संस्था राबवीत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती सर्व सभासदांपर्यंत पोहोचेल आणि त्यांच्यामध्ये सामाजिक आस्था जोपासण्याचे मोठेच काम संस्थेतर्फे होईल यात शंका नाही. हे त्रैमासिक संस्थेच्या पुढील कार्यासाठी एक महत्वाचा प्रेरणादाई दस्तावेज होईल. असा विश्वास वाटतो. असे नवनवे उपक्रम राबवले जातात तेव्हाच संस्था चालतात, मोठया होतात.

संस्थेच्या पूर्वकाळी 'कुळागर' नावाचे हस्तलिखीत संस्थेतर्फे करीत होतो त्याचे सहज स्मरण झाले. आपणास मनापासून धन्यवाद, शुभेच्छा!

**– रामदास प्रभु गांवकर**
माजी उपाध्यक्ष, धि गोवा हिंदु असोसिएशन

## शुभेच्छा!



"गोमंत तरंग" त्रैमासिकाचा पहिला अंक 'धि गोवा हिंदू असोसिएशन' नव्या थाटात प्रकाशित करीत आहे. गोव्या प्रमाणेच महाराष्ट्रातील कला, साहित्य आणि संस्कृतीच्या पटाची भव्यता व वैभव वर्धिष्णू करण्याचे कार्य 'धि गोवा हिंदू असोसिएशनने केले आहे. त्यात 'गोमंत तरंग' मानाचा तुरा शोभेल, अशी पत्रकारिता करेल, ही सदिच्छा! संपादक जितेश सावंत यांच्या नव्या जबाबदारीला शुभेच्छा!

**– ज्ञानेश महाराव**
(ज्येष्ठ पत्रकार- संपादक, नाटककार)

## शुभेच्छा!



'धि गोवा हिंदु असोसिएशनच्या 'गोमंत तरंग' या पहिल्या अंकाच्या प्रकाशन सोहळयानिमित्त तुमचे मन:पूर्वक अभिनंदन! हा अंक वाचकांच्या मनावर अधिराज्य गाजवेल, यात शंका नाही. हा अंक घराघरात पोचावा हीच सदिच्छा. अभिनंदन!

**– राजन वाघधरे**
चित्रपट व टेलिव्हिजन दिग्दर्शक, एडिटर आणि निर्माता



सप्रेम नमस्कार !

नितांत सुंदर, निसर्गरम्य आणि आपल्या कलागुणांनी भरलेल्या गोव्याची संस्कृती यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या धि गोवा हिंदु असोसिएशन, कला विभाग यांच्या वतीने सादर करण्यात आलेल्या आजवरच्या सर्व प्रकारच्या कलाकृती या नेहमीच प्रदर्शनीय, मनाला आनंद देणाऱ्या असतात. त्यातून अनेक बोध घेण्याजोग्या तसेच प्रेरणा देणाऱ्या कलाकृती सादर होताना मी माझ्या बालपणापासून पाहिलेले आहे. रायगडाला जेव्हा जाग येते, जिथे गवताला भाले फुटतात, मत्स्यगंधा अशा अनेक विविध प्रकारच्या नाट्यकृतींनी माझ्या बालमनावर तेव्हापासून संस्कार केलेले मला चांगले आठवतात. अशा या संस्थेचे कार्य मधल्या काही काळात काहीसे थंडावलेले पाहायला मिळाले, मात्र आता पुन्हा एका नव्या नाट्यकृतीने ही संस्था जोमाने आणि नव्यादमाने कार्यरत झाल्याचे पाहायला मिळाले असून हे निश्चितपणे आनंददायी आहे. 'गोमंत तरंग' या नावाने नवीन ऑनलाइन त्रैमासिक सुरू होत आहे हे वाचून आनंद झाला. सध्याच्या डिजिटल युगात संपर्कासाठी सोपे आणि जलद असणाऱ्या माध्यमाची निवड यासाठी केलेली आहे हे अत्यंत योग्य आणि समर्पक आहे. या माध्यमातून महाराष्ट्रभर पसरलेल्या तमाम गोमंतवासीयांना आपल्या मूळ मातीशी जोडले गेल्याचा आनंद मिळत राहणार आहे. गोमंतकीयांनी आपल्या अनेक कलागुणांनी महाराष्ट्राला वैभव संपन्न केलेले आपल्याला पाहायला मिळते. त्याचाच एक भाग म्हणून हे त्रैमासिक देखील आपल्या यशाचे शिखर गाठेल यात शंका नाही. या त्रैमासिकाला शुभेच्छा देताना मला अत्यंत आनंद होत आहे. हे त्रैमासिक आपल्या उद्देशात लवकरात लवकर सफल होवो आणि त्याची उत्तरोत्तर प्रगती हो हीच सदिच्छा!

**मिलिंद लिमये,**

वरिष्ठ पत्रकार, संपादक, mmcnewsnetwork.com

## शुभेच्छा!



धि गोवा हिंदु असोसिएशन रोखडेंच 'गोमंत तरंग' हें आपलें ऑनलायन त्रैमासीक सुरू करता हाची भोव खोस आसा. धि गोवा हिंदु असोसिएशन ही एक आद्य संस्था आनी ह्या संस्थेचो वावर कितलिशींच दसकां लोकांक प्रेरणा दीत आसा. असोसिएशनान सादर केल्ली नाटकां अजुनय लोकांच्या मनांत घट्ट घर करून बसल्यात. संस्थेचो सामाजीक वावरूय देखदिणो. आतां ही संस्था आपले स्वताचें त्रैमासीक सुरू करता. ह्या साहित्यीक वावरांतल्यानय जायत्या जाणांक एक नवी माची मेळटली अशी आस्त बाळगितां. साहित्य समाजाक समृध्द करता, समाजाच्या विचारांची आनी फुडाराची दिका थारायता. संस्थेच्या ह्या निर्णयाचेंय भांगर जावं आनी हें त्रैमासीक एक नवीन मैलाचो फातर जावं अशी मनाकाळ जांतल्यान इत्सा. म्हज्यो लाख लाख शुभेच्छा.

**Smt. Anvesha Singbal**
Journalist Sahitya Akademi
Youth Award (2015)

## शुभेच्छा!



शुभ संदेश धि गोवा हिंदु असोसिएशन तर्फे गोमंत तरंग हे नवीन त्रैमासिक सुरू होत आहे हें कळल्यावर आनंद झाला.

ह्या त्रैमासिकाचा या भागातील लोकाना, साहित्यिकाना, कलावंताना नवी उभारी, दिशा देण्याकरिता निश्चितच उपयोग होईल.

हे व्यासपीठ कलाकारांना निश्चितच प्रोत्साहन देईल.

या नव्या उपक्रमास आभाळभर शूभेच्छा.

**प्रा. डॉ. वामन रा. नायक,**
रुद्र महिमा, मेरशी, गोवा.



गोव्यातील अनेक कलाकारानी धि गोवा हिंदु असोसिएशनच्या सहकार्याने मुंबईत आपले अस्तित्व निर्माण केले आहे. मुंबईत असूनही सतत गोव्याचा विचार करणारी ही संस्था आता गोव्याची कला, संस्कृती, साहित्य आणि विविध क्षेत्रात गोव्याचे अस्तित्व टिकून ठेवण्यासाठी गोमंत तरंगऑनलाइनत्रैमासिक सुरू करत आहे.या मासिकामुळे गोव्याच्या कलाकारांना आणि साहित्यिकांना आपली कला जगभर पोहोचवण्यासाठी नक्कीच मदत होणार आहे. तुमच्या या सुज्ञ उपक्रमास लाख लाख शुभेच्छा.

तुमच्या या उपक्रमामुळे गोव्याची संस्कृती आणि कला जगभर पोहोचेल अशी आशा आहे. शुभेच्छा!

**गंगाराम (सतीश) रा. नार्वेकर**
रंगकर्मी, गोवा

## शुभेच्छा!

गोवा हिंदू असोसिएशनला १०० वर्षांहून अधिक वर्षांच्या अखंड सेवेसाठी मनापासून सलाम.मराठी संगीत नाटकाचे संवर्धन आणि गोव्याची समृद्ध सांस्कृतिक ओळख जपण्यात तुमची भूमिका पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी आहे.

गोमंत तरंग या ऑनलाईन त्रैमासिकासाठी मन:पूर्वक अभिनंदन आणि भावी वाटचालीस उत्तुंग यशाच्या शुभेच्छा!

**डॉ. अमोल नाईकवाडी, धन्वंतरी मेडिकल ट्रस्ट**

## शुभेच्छा!

धि गोवा हिंदू असोसिएशन सामाजिक आणि कलेच्या क्षेत्रातील अग्रगण्य जुनी आणि जाणतीसंस्था.

ही संस्था एक नवा उपक्रम म्हणून गोमंत तरंग हे ऑनलाईन त्रैमासिक सुरू करत आहे. त्यासाठी संस्था आणि संस्थेचे सहकारी यांचे अभिनंदन.

प्रार्थना होऊन त्यांचे विचार सर्वदूर गुंजत राहोत या शुभेच्छा.

आपला स्नेहांकित.

**विश्वास सोहोनी (नाट्य दिग्दर्शक)**


## शुभेच्छा !

धि गोवा हिंदु असोसिएशन ही आपली संस्था शंभरी पार करूनही अद्याप ताठ कण्याने उभी आहे. ती मान्यवर सभासद आणि निरलस कार्यकर्त्यांच्या बळावर नुसती उभीच नाही तर वैभवशाली परंपरांच्या धाडसाने आणि जिद्दीने पुनरुज्जीवन करीत आहे. एवढेच नाही तर संस्थेत नवनव्या कल्पनांचे धुमारेही फुटू लागलेत.

त्यातीलच एक म्हणजे ऑनलाईन (online) त्रैमासिक सुरू करायचे आहे. आता दूरवरचे सभासद, कार्यकर्ते आणि हितचिंतक नव्याने संस्थेशी जोडले जाणार आहेत. या नव्या त्रैमासिकास हार्दिक शुभेच्छा. प्रतिपच्चंद्रलेखे प्रमाणे हे त्रैमासिक वर्धिष्णू व्हावे, या त्रैमासिकातून गोवा हिंदु असोसिएशन परिवारातील मनामनांचे पूल जोडले जातील हीच शुभ आकांक्षा !

**स्मिता पर्तगाळकर कार्याध्यक्ष,**
**धि गोवा हिंदू असोसिएशन**

## शुभेच्छा !



'गोमंत तरंग' नवारंभं उपक्रमांस काव्यमय शुभेच्छा

'गोमांत तरंग' हा साहित्य सेवेचा नवा अक्षर आरंभ गोवा हिंदू असोसिएशन ची राहो किर्ति अभंग

करुनी लेखन वाचन रसिक होतील साहित्यात दंग साहित्य निर्मितीचा उदाळतील मधूर रंग

संपादक, पदाधिकारी आणि कार्यकारी मंडळास अनेक हार्दिक शुभेच्छा

**शुभेच्छुक, अंजना कर्णिक**
लेखिका, कवयित्री निवेदिका अध्यक्ष,
कोकण मराठी साहित्य परिषद दादर शाखा २०२५ ते २८.



गोव्याची कला, संस्कृती, साहित्य यांचा वैभवशाली त्रिवेणी संगम गोमंत तरंग या ऑनलाईन त्रैमासिकात होणार आहे ही समस्त वाचकांना खास पर्वणी आहे. शांत, सुशेगाद गोव्यात प्रत्येक क्षेत्रात घडणाऱ्या निसर्ग सौंदर्याने नटलेल्या गोव्याची प्रतिमा जगभरातील वाचकांना नक्कीच आकर्षित करेल, यात संदेह नाही. धि गोवा हिंदु असोसिएशन सारख्या प्रतिष्ठित संस्थेने उचललेल्या या स्वागतार्ह पावलाने पर्यटकांना गोव्याचे आकर्षण अधिकच वाटणार आहे. संस्थेचे आणि सर्व पदाधिकाऱ्यांचे अभनंदन!... अभिनंदन!!

**कविता आमोणकर, मडगाव गोवा.**
लेखिका, पत्रकार, कवयित्री

## शुभेच्छा !

गोवा हिंदू असोसिएशनच्या विविध उपक्रमांपैकी नाट्य शाखेशी माझा दीर्घ काळ संबंध आला. उत्तम नाटकांची परंपरा पुनरुज्जीवित होत आहे याचा आनंद आहे. इतर कार्याची मला कल्पना आहे.त्यात गोमंत तरंगने भर पडणार.

मराठी, कोकणी, हिंदी, इंग्लिश आणि पोर्तुगीज भाषांत सेतू बांधण्याचे महत्त्वाचे काम आपल्याला करायचे आहे.

**– श्री. रामदास भटकळ - कवी**
ज्येष्ठ साहित्यिक आणि प्रकाशक

गोमन्तकियांच्या तरल संवेदनांचे तरंग अविरत सर्वत्र या ना त्या स्वरूपांत उठत, उमलत असतात. गोमन्तकांत आणि गोमन्तकाच्या बाहेर वास्तव्य करून असणाऱ्या या गोमन्तकियांचे कार्य, अनुभव आणि सृजनशिलता शब्दबद्ध करण्यास 'गोमन्त तरंग' सतत खुणावत राहील यात शंका नाही.या नव्या त्रैमासिकाचे स्वागत करताना येवढंच म्हणेन 'शुभास्ते पंथान: सन्तु !'

**देवीदास कदम**
लेखक आणि कोकणी भाषेतील साहित्य अकादमी पुरस्कार विजेते.

धि गोवा हिंदु असोसिएशन आपले 'गोमंत तरंग' हे ऑनलाईन त्रैमासिक सुरू करीत आहे ही खरोखरच आनंदाची गोष्ट तर आहेच पण कौतुकास्पदही आहे. गेली कित्येक वर्षे ही संस्था अनेक उपक्रम राबवून समाजासाठी भरीव योगदान देत आहे. आजपर्यंत संस्थेने कित्येक हुषार व गरजू विद्यार्थ्यांना स्कॉलरशीप देऊन मदत केली आहे तसेच आजारी पेशंट्सना मदत केली आहे. कितीतरी गोमंतकीय कलाकारांना संस्थेने मदतीचा हात दिला आहे. धि गोवा हिंदु असोसिएशनने अनेक दर्जेदार नाटके रंगभूमीवर सादर करून आपले नाव प्रेक्षकांच्या मनावर कायम कोरले आहे. अजूनही नाट्य तसेच संगीत क्षेत्रात त्यांचे कार्य अविरत चालूच आहे. त्यांचे हे कार्य लोकांपर्यंत पोचण्यास ह्या ऑनलाईन 'गोमंत तरंग' त्रैमासिकाची मदत होऊन अनेक ध्येयवादी तरूण संस्थेला जोडले जातील व असेच भरीव कार्य त्यांच्या हातून घडेल अशी अपेक्षा बाळगून या त्रैमासिकाच्या प्रकाशनाला शुभेच्छा व्यक्त करते.

**– रेखा अवधूत पोकळे, अवधूत तु. पोकळे**
म्हापसा गोवा

Goa Hindu Association Mumbai , was formed around 100 years back , mainly to support Goan Hindus who were migrating to Mumbai for various reasons. This activity was done meticulously over the years & helped thousands of Goans initially. During its journey the Association also formed Cultural wing and produced Marathi plays which helped the name association to reach entire community in Mumbai, Goa and elsewhere.

They started philanthropic activities like scholarships, prizes to deserving students and also reading and reference library set up in Mumbai.

Another step was establishing Snehmandir centre in Goa, which is now a separate set up and is doing excellent work for caring old age inmates.

Associations Annual program of felicitating reputed dignitaries from various fields like Literature, Acting, Direction, and honouring them with awards sponsored in the name of our reputed Goans is a prestigious event .

Overall 100 years journey , I think is very satisfying for all the office bearers who relentlessly worked hard to keep the goan flag flying across Mumbai , Goa. We salute them as well as all the people who supported the organisation over the years.

From this year they are reviving cultural wing and starting regular quarterly online magazine 'Gomant Tarang'.

I must congratulate all the editorial staff, Adhyaksh Shri Sarafji, Upadhyaksh Nirupabai , Shri Vijay Kenkre and Shri Anil Kakode and all those involved for supporting this organisation.

I also must compliment them for starting again Marathi plays under the banner of Goa hindu association. This type of plays, music, cultural programs will give identity, image building to organisation.

Since now the original motive of helping Goans who were migrating Mumbai is not relevant, suggest we can focus more on expanding the organisation in Mumbai, Goa. There are so many Goans residing in Mumbai who are in various field can contribute for the cause. Also suggest to take a branch in Goa which will connect & help the organisation. For any challenges we are with you.

Thank you.

Dev bare karu!

**Regards, FC Dr. Umesh Joshi**
Chairman Trustee - Green Plus Foundation
Think Global, Act Responsible, Stay Sustainable

धि गोवा हिंदू असोसिएशन सामाजिक आणि कलेच्या क्षेत्रातील अग्रगण्य जुनी आणि जाणती संस्था.ही संस्था एक नवा उपक्रम म्हणून 'गोमंत तरंग' हे ऑनलाईन त्रैमासिक सुरू करत आहे.

त्यासाठी संस्था आणि संस्थेचे सहकारी यांचे अभिनंदन. प्रार्थना होऊन त्यांचे विचार सर्वदूर गुंजत राहोत या शुभेच्छा. आपला स्नेहांकित. विश्वास सोहोनी. (नाट्य दिग्दर्शक)

नमस्कार! 'धि गोवा हिंदु असोसिएशन' च्या 'गोमंत तरंग' ह्या आगामी ऑनलाईन त्रैमासिकाला मन:पूर्वक शुभेच्छा! संस्थेचे कार्य पाहता, हे एक कालानुरूप पाऊल आहे. ङयान्वये, पारंपरिक वाचकवर्गा प्रमाणे जॅन-झी सुद्धा या उपक्रमाकडे आकर्षित होईलच. या दूरगामी सेतुबंधनाला सुयश चिंतिते.

**– डॉ. किरण बुडकुले**

'धि गोवा हिंदू असोशिएशन' ही नामांकित संस्था 'गोमंत तरंग' हे ऑनलाईन त्रैमासिक सुरु करत आहे हे कळल्यावर खूप आनंद झाला आणि मनात विचार आला की या संस्थेचे मुख्यालय असलेल्या गोमंतक धाम या इमारतीने असंख्य आनंदाचे क्षण आणि कितीतरी थोर कलाकारांचा सहवास अनुभवला असेल नाही! माझ्या निरुपाताईमुळे मलाही या संस्थेचे कार्य जवळून पाहण्याचा योग आला. कार्यकारी मंडळ ज्या निस्वार्थ भावनेने जनहितार्थ कार्य करत आहे ते खरोखरच वाखाणण्याजोगे आहे.
या संस्थेला येणाऱ्या त्रैमासिकासाठी अनंत आणि निरंतर शुभेच्छा.

**– सुषमा देसाई (शिक्षिका)**

I was very happy to learn that The Goa Hindu Association is launching its quarterly online 'Gomant Tarang'. This is definitely a good step to introduce , important subjects related to social, educational and Medical fields and create awareness and also point out misconceptions among the people .My hearty congratulations for making The Goa Hindu Association active again. All the best.

**Dr. Varsha Khandekar (MD-Psychiatrist)**

## शुभेच्छा!

'धि गोवा हिंदु असोसिएशन' ही कला आणि सामाजिक क्षेत्रातील एक अग्रगण्य संस्था आहे. संस्थेच्या वैभवशाली परंपरेला आधुनिकतेची जोड देणारे 'गोमंत तरंग' हे ऑनलाईन त्रैमासिक सुरू होत आहे, ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे. आजच्या डिजिटल युगात आपला सांस्कृतिक वारसा जगभर पोहोचवण्यासाठी हे एक उत्तम माध्यम ठरेल. या उपक्रमाला आणि संपादकीय मंडळाला माझ्याकडून मन:पूर्वक शुभेच्छा!

**- श्री राजेश मनोहर नरे**

सदस्य, नियामक मंडळ, श्री शिवाजी मंदिर, दादर

॥ ॐ ॥ दूरध्वनी : ९८३३१६०२२४

॥ जन्मना जायते शूद्रः संस्कारात्द्विज उच्यते ॥

# सरस्वती देवी विद्या विकास न्यास (रजि.)

(Registration No. E 14269)

C/o. ६, मंदारमाला अपार्टमेंट को-ऑप. हाऊसिंग सोसायटी, पहिला मजला, द. स. बाबरेकर मार्ग, गोखले रोड (उत्तर), जादूगार तायडे चौक, दादर (पश्चिम), मुंबई - ४०० ०२८.



**श्री. यशवंत क्षीरसागर**
अध्यक्ष

**सौ. स्मिता गोरे**
खजिनदार, विश्वस्त

कोअर कार्यकारिणी सदस्य
**सौ. विनोदिनी मंत्री**
**सौ. सुषमा देसाई**

कार्यकारिणी सदस्य
**श्री. हर्षल बक्षी, श्री. अतुल ठाकूर, श्री. सुरेंद्र खेडेकर, श्रीमती छाया पेडणेकर, श्री. निलय चौबळ**

**उज्ज्वला अनिल पवार**
सचिव, विश्वस्त


दि.१९.०१.२०२६

मा. अध्यक्ष,
दि. गोवा हिन्दू असोसिएशन,
मुंबई.

माननीय महोदय,

सादर नमस्कार.

"गोमंत तरंग" हे ऑनलाईन त्रैमासिक तुम्ही सुरू करत आहात ही बातमी खरच आनंददायक आहे. सध्याच्या डिजिटल युगाला साजेसा, नवीन तंत्रज्ञानाला आपलेसे करून तरूणपिढीला आकर्षित करणारा निर्णय खरंच प्रशंसनीय आहे.

दि गोवा हिन्दू असोसिएशन म्हणजे ज्ञान, कला व समाजसेवेचा त्रिवेणी संगम आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांचे -विद्यार्थीनींचे शिक्षण पैशाअभावी अडू नये यासाठी सरस्वती देवी विद्या विकास ट्रस्ट गेली ३३ वर्ष प्रयत्नशील आहे व तुम्हां सर्वांचे बहुमोल सहकार्य आम्हांला सदैव लाभत असते. कोणतीही गोष्ट सातत्याने करणे खूप कठीण असते. तुम्हां सर्वांचे वैशिष्ट्य म्हणजे हे शिवधनुष्य तुम्ही सर्व पदाधिकारी,सहकारी निःस्वार्थपणे लीलया पेलता. मा. निरूपाताई व इतर पदाधिकारी यांच्या भेटीत नेहमी मला आपुलकी व जिव्हाळा जाणवतो. त्यामुळे तुम्हां सर्वांविषयीची कृतज्ञता द्विगुणित होते.

'गोमंत तरंग' हे ऑनलाईन त्रैमासिक अत्यंत वाचनीय असेल यात शंकाच नाही.

तुम्हां सर्वांचे अभिनंदन व पुढील यशस्वी वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा

आपली नम्र,

उज्ज्वला पवार

उज्ज्वला पवार

## वाचकांसाठी आवाहन (Appeal)

‘गोमंत तरंग’ त्रैमासिक हे आपले सामूहिक व्यासपीठ आहे !आम्ही आपल्यातील लेखकाला आणि विचारवंताला आमंत्रित करत आहोत. गोमंतकीय संस्कृती, साहित्य, कला, इतिहास, समाजकार्य आणि आपल्या अवतीभवती घडाऱ्या सकारात्मक घडामोडी यांवर आधारित आपले लेखन आम्ही आनंदाने स्वीकारू.

आपल्या मौल्यवान सूचना आणि अभिप्रायांमुळे हे त्रैमासिक अधिक समृद्ध व अर्थपूर्ण बनेल.

आपण किंवा आपल्या परिचयातील एखाद्या सदस्याने उल्लेखनीय यश संपादन केले असल्यास, ती माहिती आम्हाला जरूर पाठवा. अशा यशाचा गौरव ‘गोमंत तरंग’ मध्ये करण्यात येईल.

प्राप्त साहित्याबाबत आणि संपादनाबाबतचा अंतिम निर्णय संपादकीय मंडळाचा राहील.

**लेखन, सूचना व माहिती पाठवण्यासाठी संपर्क:**

ई-मेल:gomanttarag@gmail.com

फोन: ०२२-४९७९८२५६ / ९०८२१८३८०६

वेबसाइट: https://goahinduasso.org/

संपादकीय मंडळ, ‘गोमंत तरंग’ (थि गोवा हिंदू असोसिशएन)

## Appeal to Readers

“Gomant Tarang”, our quarterly magazine, is a collective platform for all of us.We warmly invite the writer and thinker within you to contribute articles on Goan culture, literature, art, history, social initiatives, and other positive developments in society.If you or someone known to you has achieved something noteworthy, kindly share the details with us. Such achievements will be acknowledged and featured in “Gomant Tarang.” Your valuable suggestions and feedback will help make Gomant Tarang more meaningful and enriching for all our readers. The Editorial Board reserves the final decision regarding the selection and editing of all submitted material.

**For submissions, suggestions, and information, please contact:**

Email: gomanttarag@gmail.com

Phone: 022-49798256 / 9082183806

Website:https://goahinduasso.org

Editorial Board, “Gomant Tarang” (The Goa Hindu Association)


सारस्वत बँक
सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
(शेड्युल्ड बँक)
विश्वासाच्या नात्याची अविरत परंपरा...
Strong & Steady returns with peace of mind.
FIXED DEPOSITS
आकर्षक व्याजदर!
7.30% p.a.
ज्येष्ठ नागरिकांसाठी
6.80% p.a.
इतरांसाठी
अधिक माहितीसाठी आपल्या नजीकच्या शाखेशी
किंवा www.saraswat.bank.in या वेबसाईटवर संपर्क करा.
नियम व अटी लागू. फेब्रुवारी 2026
Follow us: